ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Regn. No. B-8434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ८ ऑक्टोबर, १९५८ | अंक ४१

## विविध माहिती

**रस्त्यांवरील विक्रेत्यांना पोषाख**—कैरो शहरांतील संमिश्र वस्तीच्या भागांत पदपथावर बसून वस्तूंची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना विवक्षित पोषाख घालण्याची सक्ति करण्यांत आली आहे. विक्रेत्यांना परवाने दिलेले आहेत. खोट्या व भेसळीच्या मालाची विक्री थांबविण्यासाठी हा उपक्रम करण्यांत आला आहे.

**उदयशंकर ह्यांचा नवा दौरा**—सुप्रसिद्ध भारतीय नृत्यपटु श्री. उदयशंकर आपल्या १८ सहकाऱ्यांसह पूर्व आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेले आहेत. त्यांचा दौरा दोन महिन्यांचा आहे. ह्या अवधींत ते १६ शहरांतून व गांवांतून आपले कार्यक्रम करतील. त्यांचा आफ्रिकेंतील हा पहिलाच धंदेवाईक दौरा आहे. त्यांच्या बरोबर त्यांची नर्तिका पत्नीहि आहे.

**छोट्या उद्योगधंद्यांची परिषद**—छोट्या उद्योगधंद्यासंबंधीची अखिल भारतीय परिषद शिलाँग येथें ता. ३० ऑक्टोबरपासून तीन दिवस भरविण्यांत येणार आहे. ह्या निमित्तानें गोहाटी येथें ग्रामोद्योगीय वस्तूंचें प्रदर्शनहि भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शन २ नोव्हेंबरला खुलें करण्यांत येईल.

**अल्युमिनमचा पूल**—अमेरिकेंतील एका कारखान्यानें अल्युमिनमच्या तुळया वापरून एक पूल तयार केला आहे. पुलाची कार्यक्षमता व बळकटी दाखविण्यासाठी एंजिनिअर्स, रस्ते बांधणारे अधिकारी, इत्यादींना बोलावण्यांत आलें होतें. पुलावर ५२ टन वजनाचीं ओझीं टाकण्यांत आलीं असतांहि त्यावर कांहीं परिणाम झाला नाहीं.

**लोखंडाच्या मातीची वहातूक**—पोलादाच्या कारखान्यांना लागणारी लोहमिश्रित माती त्वरित वाहून नेण्यासाठी खरगपूर येथील रेल्वेच्या कारखान्यांत आठ चाकें असलेल्या खास वाघिणी तयार करण्यांत येत आहेत. १९५८–५९ सालीं अशा प्रकारच्या १,७५० वाघिणी दक्षिण-पूर्व रेल्वेवर वापरण्याचें ठरलें आहे.

**टॅक्सींमधून टेलिफोनची सोय**—रेडिओ बसविलेल्या ३० टॅक्सी मॉस्कोमधील रस्त्यावरून नुकत्याच फिरूं लागल्या आहेत. टॅक्सींतील रेडिओच्या साह्यानें प्रवाशांना बसल्याबसल्या कोणत्याहि खाजगी टेलिफोनचा नंबर मागवून बोलतां येईल. प्रवाशांच्या सोयी वाढविण्याच्या योजनेचा हा एक भाग आहे.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी**—आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सदस्य असलेल्या प्रमुख देशांत, प्रत्येक देशानें आपल्या वर्गणींत ५० टक्के वाढ करण्यासंबंधीं अनौपचारिक करार झाला आहे. दिल्ली येथें जागतिक बँकेसमवेत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची वार्षिक सभा लवकरच होईल. त्या वेळीं ही गोष्ट जाहीर करण्यांत येईल.

**३०० टन साखरेचें पाणी**—कराची बंदरांतील एका गुदामांतील ३०० टन साखर वेळेवर हलविण्यांत न आल्यामुळें गेल्या जुलै महिन्यांत आलेल्या पावसानें तिचें पाणी झालें, अशी माहिती कराचीमधील एका इंग्रजी वृत्तपत्रानें प्रसिद्ध केली आहे. बंदरांतील गुदामांची पुन्हा बांधणी करण्यांत यावयाची होती. पण बंदर अधिकारी व अन्नखात्याचे अधिकारी ह्यांच्यांतील भांडणामुळें हा प्रकार घडला.

**भातशेतीच्या तज्ज्ञाची परदेश भेट**—जपानी पद्धतीच्या भाताच्या लागवडीचे तज्ज्ञ श्री. हरिश्चंद्र पाटील टोकिओला गेले आहेत. तेथें भरलेल्या इंटर नॅशनल राइस कमिशनच्या बैठकीसाठी ते गेले आहेत. त्याचप्रमाणें ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत भरणाऱ्या अन्न व शेतीसंघटनेच्या बैठकीलाहि ते हजर रहाणार आहेत. भारताच्या प्रतिनिधि मंडळाचे नेते मध्यवर्ती सहकार मंत्री श्री. पंजाबराव देशमुख आहेत.

**चिनी मुलींचा विक्रम**—चीनमधील तीन विद्यार्थिनींनीं विमानांतून छत्रीच्या साह्यानें उडी मारण्याच्या बाबतींत विक्रम केला आहे. ह्या विद्यार्थिनींनीं ३,२०० फुटांवरून विमानांतून उड्या टाकल्या व छत्रीच्या साह्यानें त्या आंखून दिलेल्या वर्तुळांत व्यवस्थितपणें उतरल्या. स्त्रियांच्या बाबतींतील हा उच्चांक आहे.

**मलप्रभा नदीवरील धरण**—मलप्रभा नदीवरील धरणाची योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत हातीं घेण्यांत यावी अशी विनंती कर्नाटक राज्य सरकारनें नियोजन-समितीला केली आहे ह्या धरणामुळें बेळगांव, विजापूर व धारवाड जिल्ह्यांतील दुष्काळी भागांतील जमिनीला पाणी पुरवठा करतां येईल.

**सौराष्ट्रांत तेल सांपडण्याची शक्यता**—लुणेज ह्या गांवीं काम करणारे रशिअन तेलतज्ज्ञ सौराष्ट्रामधील घोघा भागाला व कच्छला जाण्याची शक्यता आहे ह्या भागांत खनिज तेल सांपडण्याची शक्यता मुंबई सरकारच्या भूगर्भशास्त्रज्ञानेंहि व्यक्त केलेली आहे. दरम्यान, भावनगर येथें तेलशुद्धीचा कारखाना काढण्याविषयीं सौराष्ट्रामधील लोकांच्या हालचाली चालू झाल्या आहेत.

**जिनसांच्या बदलीचा करार**—भारत व ब्रह्मदेश ह्यांच्यांतील ऐनजिनसी बदलाच्या कराराच्या मसुद्याला ब्रह्मदेशाच्या सरकारनें मान्यता दिली आहे. कराराप्रमाणें, उभयपक्षी ४ कोटी रुपये किंमतीच्या मालाची अदलाबदल होईल. ब्रह्मदेश भारताला टीकचें लांकूड, बटाटे, कांहीं प्रकारचीं ओबडधोबड रत्नें, इत्यादि माल देईल. भारत सायकली, शिवणाचीं यंत्रें, विजेचीं उपकरणें, इत्यादि माल देईल.

**गुजराती वाङ्मयाचा इतिहास**—ज्ञान-प्रसारक मंडळी ह्या संस्थेनें गुजराती वाङ्मयाचा गेल्या ११० वर्षांचा इतिहास प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. ही संघटना मुंबईमध्यें १८४८ सालीं दादाभाई नौरोजी ह्यांनीं स्थापन केलेली आहे. संस्थेचा ११० वा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्तानें हा इतिहास प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

**कापसाचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न**— दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत राज्यांतील कपाशीचें उत्पादन २०,००० गाठींनीं वाढविण्याचे प्रयत्न आंध्र सरकार करणार आहे. हें करण्यासाठी पडीक जमीन लागवडीला आणणें, दोन पिकें घेणें, सुधारलेलें बियाणें वापरणें, इत्यादि उपायांचा अवलंब करण्यांत येणार आहे.

**ट्रॅम कंपनीवर फिर्याद**— कलकत्ता ट्रॅमवेज कंपनीवर नुकसानभरपाईचा दावा लावण्याचें कलकत्ता कॉर्पोरेशननें ठरविलें आहे. कंपनीनें शहराच्या कांहीं भागांत ट्रामचे रूळ घालतांना रस्ते उखणले होते. ते नंतर कॉर्पोरेशनला दुरुस्त करावे लागले. कॉर्पोरेशन कंपनीकडून २,८६,००० रुपये नुकसानभरपाई मागणार आहे.

**जर्मन कंपनीशीं करार**— लष्कराला लागणाऱ्या मोटारींचीं एंजिनें तयार करण्यासंबंधीं भारत सरकारनें पश्चिम जर्मनींतील एका कंपनीशीं करार केला आहे. ह्या कंपनीनें केलेलीं एंजिनें पेट्रोल, डिझेल तेल अगर रॉकेलवर चालूं शकतात. तीं टिकण्यासहि चांगलीं असतात. १९५९ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारास अशा प्रकारचें पहिलें एंजिन भारतांत तयार होईल.

**भारत इलेक्ट्रॉनिक्स कंपनी**—भारत सरकारच्या संरक्षण-खात्यातर्फे चालविल्या जाणाऱ्या भारत इलेक्ट्रॉनिक्स ह्या बंगलोर येथील कंपनीला १९५६-५७ सालांत २ लक्ष रु. पेक्षा अधिक तोटा आला असें कंपनीच्या वार्षिक अहवालावरून दिसतें. कंपनी सार्वजनिक मालकीच्या विभागांतील आहे.

**बिहारमध्यें खाण-विषयक संस्था**—बिहार राज्य सरकारनें हजारीबाग जिल्ह्यांत खाण-विषयक संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. संस्थेसाठी ७,३६,००० रुपये खर्च येईल. बिहार-मध्यें अभ्रक मोठ्या प्रमाणावर सांपडतें. खाणी असणाऱ्या भागांतच एका मध्यवर्ती गांवीं संस्थेची उभारणी करण्याचें ठरलें आहे.

**डॉलर-भागांतील आयात**—कॉमनवेल्थ राष्ट्रगटाच्या मॉन्ट्रिअल येथें भरलेल्या आर्थिक परिषदेंत ब्रिटननें डॉलरच्या कक्षेंतील देशांकडून होणाऱ्या आयातीवरील निर्बंध ढिले केल्याचें जाहीर केलें होतें. वृत्तपत्रांना लागणारा कागद, निरनिराळ्या प्रकारची यंत्रसामुग्री, डबा-बंद मासे, इत्यादि प्रकारच्या मालाची आयात ब्रिटनमध्यें आतां अधिक मोकळेपणानें होऊं लागेल.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य



बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५८,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ८ ऑक्टोबर, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तेलाची वाढती गरज भागण्याची शक्यता

भारताचा औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या प्रयत्नांत खनिज तेलाच्या देशांतर्गत सांठ्याला फार महत्त्व आहे. पण खनिज तेल प्रथम भूगर्भांत असलें पाहिजे आणि तें यशस्वीरीत्या शोधून व्यापारी दृष्टीनें त्याचा उपसा किफायतशीर होईल कीं नाहीं हें पहावें लागतें. तेलाच्या शोधाचा इतिहास असें सांगतो कीं तेलाच्या संभाव्य प्रदेशांत १० विहिरी खोदल्या तर त्यांतील एकींतच तेल सांपडतें. भारतांत ज्वालामुखी व होशिआरपूर ह्या ठिकाणीं तेलाच्या विहिरी खोदण्याचें काम चालूं असून त्यांत यश येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. खंबायतजवळ लुणेज येथें खणण्यांत येत असलेली विहीर सर्वांत अधिक यशस्वी ठरलेली दिसते.

भारताला दरसाल किमान सुमारें ५० लाख टन अशुद्ध तेलाची गरज आहे. देशांत होणारें उत्पादन मात्र अवघें ४ लाख टन आहे. आसाममधील दिगबोई येथें उपसण्यांत येणारें अशुद्ध तेल तेथेंच शुद्ध करण्यांत येतें. बाहेरून आयात करण्यांत येणाऱ्या अशुद्ध तेलावरील संस्करण मुंबई व विशाखापट्टम् येथील तीन कारखान्यांतून करण्यांत येतें. हे कारखाने गेल्या पांच वर्षांत उभारण्यांत आलेले असून त्यांच्यामुळें परदेशीय चलनाची बरीच बचत झाली आहे. पेट्रोलपासून बनविण्यांत येणारे अनेक पदार्थ पूर्वी आयात करावे लागत असत. तथापि भारताला लागणारें सर्व तेल देशांतच पैदा करण्याचे प्रयत्न करण्यांत आले नाहींत, तर परदेशीय चलनावरील ताण फारसा कमी होणार नाहीं; उलट, तेलाच्या वाढत्या गरजेबरोबर तो वाढतच जाईल. सध्यां भारताला परदेशांतून अशुद्ध तेल आयात करण्यासाठी दरसाल ५० कोटी रुपये खर्च करावे लागतात, व ४० लाख टन अशुद्ध तेलाची आयात करावी लागते. ह्या तेलावर संस्कार करून त्यापासून डिझेल तेल, रॉकेल, मोटारींचें तेल, विमानाचें तेल, तयार करण्यांत येतें. रॉकेल तेलाच्या आयातीसाठींच भारताला १२ कोटी रुपये खर्च करावे लागतात. अशुद्ध तेल व त्यापासून तयार होणाऱ्या वस्तू ह्यांच्या आयातीसाठीं भारताला १५० कोटी रुपये खर्च करावे लागतात म्हणजे, अन्नधान्याप्रमाणेंच तेलासाठींहि आज परदेशांच्या तोंडाकडे पहावें लागतें.

तेलाच्या वाढत्या गरजेची परिस्थिति पुढीलप्रमाणें आहे. १९६१ च्या सुमाराला भारताला दरसाल ७० लाख टन अशुद्ध तेल लागेल. १९६६ च्या सुमारास १·१ कोटी टन तेल लागेल, १९७१ सालीं २·५ कोटी टन तेल लागेल व १९७६ सालीं म्हणजे पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ५ कोटी टन तेल लागेल. तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्यासाठी भारताला येत्या अठरा वर्षांत ३,००० कोटी रुपये खर्चावे लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे. तेलाचा शोध, त्यासाठी खोदकाम, नंतर सांपडलेल्या तेलाचें शुद्धीकरण आणि वाटप, ह्या कामासाठी इतकी रक्कम लागणार आहे. तेलाबाबतची ही निकड लक्षांत घेऊन भारत सरकारनें १९५६ च्या ऑगस्ट महिन्यांत ऑइल अँड नॅचरल गॅस कमिशनची स्थापना केली. तेल संशोधनाचें आधुनिक तंत्र वापरून हिमालयाच्या पायथ्याच्या टेकड्या, आसाम, गंगेचें खोरें, पश्चिम बंगाल, राजस्थान, खंबायत, कच्छ आणि पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील पट्टा, ह्या भागांत शोध चालूं करण्यांत आला. सुमारें ४ लाख चौरस प्रदेशांत तेलाचा शोध करण्यांत येणार आहे. त्यांपैकी २॥ लाख चौरस मैल प्रदेशांत तेल सांपडेल असा अंदाज आहे. हें काम फार खर्चाचें आहे. उदाहरणार्थ, खंबायतजवळील तेलाच्या खोदकामांत यश आलें नसतें तर ५० लाख रुपये फुकट गेले असते.

---

## पश्चिम जर्मनीच्या प्रगतीची किमया

१९४५ सालीं दुसऱ्या महायुद्धांत जर्मनीचा पराभव झाल्यावर तेथील आर्थिक परिस्थिति भयानक झाली होती. जर्मनीच्या शत्रूंच्या लष्करानें सर्व देशभर आपला अंमल बसविला होता. जर्मनीच्या तरुणांपैकी लक्षावधि तरुण मारले गेले होते. कारखाने उध्वस्त झाले होते. शेतीचा नाश झाला होता. शहरें धुळीला मिळालीं होतीं आणि वाहतूक थांबलेली होती. त्यावेळच्या स्थितीचें आंकडेशास्त्रज्ञांनीं रंगविलेलें चित्र असें होतें. प्रत्येक जर्मन नागरिकाला ४ वर्षांनीं मोज्याची एक जोडी मिळण्याची शक्यता होती. १० वर्षांनीं एक आंगरखा मिळाला असता. सबंध पोषाख ४० वर्षांनीं मिळाला असता. दीडशें लोकांपैकी एकाला दांत घासण्याचा ब्रश मिळत होता आणि तीन मृत माणसांपैकी एकालाच शवपेटिका मिळत होती. पण आज जर्मनीनें उद्योगशीलता, चिकाटी व संशोधकबुद्धि ह्यांच्या साह्यानें सर्व चित्र बदलून टाकलें आहे. अवघ्या तेरा वर्षांच्या अवधींत पश्चिम जर्मनीनें आपलें औद्योगिक उत्पादन सहा पटींनीं वाढवून युद्धापूर्वींहि जितकी सुबत्ता नव्हती तेवढी सुबत्ता निर्माण केली आहे. जगाच्या व्यापारांत आज जर्मनीचें स्थान तिसरें आहे. जगांतील एक प्रमुख धनको राष्ट्र म्हणून त्यानें नांव मिळविलें आहे. युद्ध संपल्यावर जर्मनींत कोळसा नव्हता, पोलाद नव्हतें, अन्न नव्हतें. शिवाय चलनवृद्धीच्या संकटांत देश बुडून गेला होता. आज जर्मनीच्या चलनाला सोन्याचा अगर परदेशीय चलनाचा भरभक्कम आधार आहे. ही सर्व किमया घडवून आणणारे गृहस्थ म्हणजे जर्मनीचे अर्थमंत्री मि. लुडविग एरहार्ड हे होत. जर्मनीचा पराभव होणार हें ओळखून त्यांनीं औद्योगिक पुनरुत्थानाची योजना आपल्या मनाशी पूर्वींच निश्चित केलेली होती.

---

**कापडाच्या निर्यातींत घट**—भारतामधून ब्रिटनला निर्यात होणाऱ्या कापडाच्या निर्यातींत घट झाल्याचें लोकसभेंत सरकारतर्फें सांगण्यांत आलें. इतर देशांकडून होत असणारी वाढती स्पर्धा आणि ब्रिटनमध्यें तयार होणाऱ्या कापडाचा अधिक वापर, ह्या कारणांनीं निर्यातींत घट झाल्याचें सांगण्यांत आलें.

## आरोग्य व अर्थोत्पादन ह्यांचे संबंध

जागतिक आरोग्य संघटनेच्या आशियाई कमिटीचें ११ वें अधिवेशन दिल्ली येथें भरलें होतें. अधिवेशनाचें उद्घाटन करतांना भारताचे उपाध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं, अपुरा विकास झालेल्या राष्ट्रांच्या मागासलेल्या अवस्थेविषयीं एका नव्या दृष्टिकोनांतून प्रकाश टाकला. ते म्हणाले कीं, भारतांतील व आशिआंतील लोकांचें सर्वसाधारण आरोग्य सुधारणें अतिशय जरूरीचें आहे. त्यांच्या आरोग्यांत व रोगांच्या प्रतिकारक्षमतेंत सुधारणा झाल्याशिवाय औद्योगिक व शेतीच्या उत्पादनांत फारशी वाढ होण्याची शक्यता नाहीं. अपुरा विकास झालेल्या, मागासलेल्या देशांतील लोकांपुढें शारीरिक आरोग्य कसें टिकवावें हा मुख्य प्रश्न आहे. उलटपक्षीं, प्रगत देशांतील नागरिकांत मनोव्यथांचें प्रमाण एकसारखें वाढत आहे. आज अशी स्थिति आहे कीं, एखादें काम करण्यास प्रगत देशांतील एकच माणूस पुरेसा असला तर तेंच काम करण्यास भारतासारख्या अविकसित देशांत पांच-सहा माणसें लागतात. रोगनिवारक प्रयत्नांची आवश्यकता तर आहेच; पण त्याचबरोबर माणसाच्या स्वभावांतच बदल करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. आधुनिक तांत्रिक प्रगतीमुळें माणसाचें मन व त्याच्या भोंवतालची परिस्थिति ह्यांत विसंवाद निर्माण झालेला आहे. म्हणूनच मानसिक रोगांचा प्रसार प्रगत देशांत वाढत आहे. जगाच्या एका भागांतील लोकांना आधुनिक आरोग्याच्या सर्व सोयी व सवलती मिळत असतांना दुसऱ्या भागांतील लोकांनीं व्याधिग्रस्त रहावें, ही स्थिति चालणार नाहीं. ह्या बाबतींत जागतिक आरोग्य संघटनेनें आरोग्याचा किमान दर्जा टिकविण्यासाठीं जे प्रयत्न सर्व जगांत चालविले आहेत, ते स्वागतार्ह आहेत.

## अमेरिकन खाजगी भांडवलाची अपेक्षा

अमेरिकेंतील प्रमुख बँकर मि. विक्लिफ इरीव्ह ह्यांचें मुंबई येथें भाषण झालें. व्याख्यानाचा विषय 'भारतासाठीं अमेरिकन भांडवल' असा होता. ह्या विषयासंबंधीं आपले विचार व्यक्त करतांना मि. इरीव्ह म्हणाले कीं, अमेरिकन भांडवल भारतांत वाढत्या प्रमाणावर यावयाचें असल्यास उभयता देशांनीं परस्परांची अधिक माहिती करून घेणें अगत्याचें आहे. भारतासंबंधीं व भारताच्या गरजांसंबंधीं अमेरिकेनें अधिक जिज्ञासा दाखविली पाहिजे. त्याचप्रमाणें, भारतानें भांडवलाच्या आकर्षणासाठीं परिस्थिति अनुकूल केली पाहिजे. गेल्या महायुद्धापासून अमेरिकेनें परदेशांना मदत म्हणून सुमारें ३०,००० कोटि रु. ह्या ना त्या स्वरूपांत दिलेले आहेत. अमेरिकेच्या चालू अंदाजपत्रकांतील ६ ते ७ टक्के रकम परदेशांना मदत करण्यासाठीं राखून ठेवण्यांत आली आहे. कारण, अशा रीतीनें परदेशांशीं मैत्रीचे संबंध ठेवल्यानें अमेरिकेच्याच स्थैर्याला व हिताला मदत होईल. भारतापुढें असलेल्या प्रश्नांचा सहानुभूतिपूर्वक विचार होईल ह्यांत शंका नाहीं. पण अमेरिकन भांडवल मिळविण्याच्या बाबतींत भारताला इतर देशांशीं स्पर्धा करावी लागेल. कारण, ज्या देशांत भांडवल गुंतविलें असतां कमीत कमी जोखीम स्वीकारून अधिकांत अधिक नफा होण्याची शक्यता असेल त्याच देशांत भांडवल गुंतविण्यास अमेरिकन लोक तयार होतील. पैसे गुंतवूं शकणाऱ्या अमेरिकन लोकांचा हाच मुख्य हेतु असतो. शिवाय, भांडवल गुंतविण्यांत आल्यावर तें अनुत्पादक अगर निरर्थक ठरेल अशा प्रकारची परिस्थिति उत्पन्न करण्यांत येणार नाहीं ह्याची हमीहि त्यांना मिळणें आवश्यक आहे. तरच भांडवल आकर्षित होण्याची शक्यता आहे.

## लुणेज येथें सांपडलेला तेलाचा सांठा

खंबायतजवळ लुणेज ह्या खेड्यांत चालू असलेल्या खनिज तेलाच्या संशोधनास भरघोस यश आल्याचें दिसत आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेंत तेलाबाबतचें परावलंबित्व हा सर्वांत कच्चा दुवा आहे. कोणत्याहि उद्योगप्रधान देशाचें उत्पादक सामर्थ्य तेलाच्या अभावीं लंगडें पडतें. शिवाय, तेलाच्या भूगर्भगत सांठ्याचा शोध करून तें व्यापारी दृष्टीनें उपलब्ध करणें हें काम अतिशय खर्चाचें व वेळाचें आहे. त्या दृष्टीनें पहातां खंबायतजवळील संभाव्य तेलाच्या खाणी फारच महत्त्वाच्या आहेत ह्यांत शंका नाहीं. लुणेज येथें तेलाची विहीर खोदणाऱ्या तज्ज्ञांच्या मतानें भूगर्भगत फार मोठा तेलाचा सांठा उपलब्ध झालेला आहे. खंबायतच्या आखाताच्या पूर्वेस व पश्चिमेस आणि बडोद्यांत कांहीं ठिकाणीं नैसर्गिक वायू आढळून आला आहे. त्यावरून तज्ज्ञांनीं असा तर्क केला आहे कीं, ह्या भागांत तेलाचा सांठा बराच दूरवर पसरलेला आहे आणि तेल भरपूर प्रमाणांत उपलब्ध होणार असल्यानें तें व्यापारी दृष्टीनें किफातशीर होणें शक्य आहे. तथापि, एखाद्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर तेल सांपडलें तरी आणखी पांचसहा ठिकाणीं विहिरी खोदून खातरी झाल्यावरच संपूर्ण यश पदरांत पडलें असें म्हणतां येईल. शिवाय, खंबायतजवळील तेलाच्या संशोधनाचें स्वरूप मर्यादित आहे. ह्या भागांत तेलाचा सांठा किती प्रमाणांत आहे हें अजमावण्याचेंच कार्य मुख्यत: करण्यांत येत आहे. म्हणून, तेलाचा सांठा भरपूर आहे, असें ठरलें तरीसुद्धां त्याच्या शुद्धीकरणाची व्यवस्था होईपर्यंत तें उपसण्यांत येण्याची शक्यता नाहीं. खंबायतजवळ सांपडलेली तेलाची विहीरहि रशिआंतील कॉकेशस पर्वतांत सांपडणाऱ्या विहिरीसारखी आहे. म्हणजे, विहीर जितकी खोल जाईल तितका तेलाचा उसळण्याचा दाब वाढत आहे.

## पंचवार्षिक योजनेसाठीं सोन्याच्या सांठ्याचा उपयोग

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठीं लागणारा पैसा देशांतल्या देशांत अधिक प्रमाणांत उभा करण्यासाठीं लोकांच्याजवळ असलेल्या सोन्याच्या सांठ्याचा उपयोग करून घेण्यांत यावा अशी सूचना करण्यांत आली आहे. ह्यासंबंधीं सरकारच्या धोरणाचा खुलासा नियोजन-मंत्री, श्री. नंदा, ह्यांनीं लोकसभेंत केला आहे. ही सूचना तितकीशी व्यवहार्य नसल्याचें सांगून ते म्हणाले कीं ह्याबाबत परिस्थिति अशी आहे : भारतांत आज सुमारें १,७५० कोटी रुपयांचें सोनें लोकांजवळ आहे. त्यापैकी बहुतेक जवाहिरांच्या व सोन्याच्या दागिन्यांच्या स्वरूपांत आहे. ह्या वस्तू अर्थातच स्त्रियांच्या ताब्यांत आहेत. सोन्याची आंतरराष्ट्रीय किंमत दर तोळ्याला ६२·५० रुपये आहे. देशांतील किंमत मात्र दर तोळ्याला १०३ रुपये आहे. लोकांना जर आंतरराष्ट्रीय दरानें किंमत देऊं केली तर सोनें सरकारला विकत देऊं करण्यांत येईल. ह्या गोष्टीला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनें संमति दिली, तरीसुद्धां सोन्याच्या आंतरराष्ट्रीय अधिकृत किंमतीपेक्षा अधिक किंमत देण्याचा व्यवहार सरकारला करतां येणार नाहीं. सोन्याबद्दल रोखे देऊं केले अगर सोनें परत देण्याचें अभिवचन दिलें तर ज्या लोकांनीं सरकारी रोख्यांत व बचतयोजनांत पैसे गुंतविले त्यांच्यापेक्षा ज्यांनीं सोन्यांत पैसे घातले त्यांना अधिक फायदा मिळेल. ह्याविषयीं खरी गोष्ट अशी आहे कीं लोकांनीं आपले पैसे सोन्यांत गुंतवूं नयेत म्हणून त्यांना शिकविण्यांत आलें पाहिजे. त्याचप्रमाणें, देशांतील सर्वसाधारण आर्थिक परिस्थिति अशी असली पाहिजे कीं सरकारी रोखे, अल्प बचत-योजना, उद्योगधंद्यांचें भाग भांडवल, ह्यांत पैसे गुंतविणाऱ्यांना आपल्या गुंतवणुकीची किंमत स्थिर राहील अशी खात्री वाटली पाहिजे.

## यांत्रिकाची यात्रा

### आद्य महाराष्ट्रीय कारखानदार, श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर, यांचें चरित्र

महाराष्ट्राचे आद्य कारखानदार आणि किर्लोस्कर कारखान्यांचे जनक कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर ह्यांच्या कार्याची महाराष्ट्रीयांना जाणीव आहे. तथापि, त्यांचें समग्र चरित्र आणि थोरवी, ह्यांची पुरी कल्पना थोड्यांनाच असणार. "शिक्षण, पैसा अथवा वशिला यांचा सर्वतोपरीं अभाव असलेल्या लक्ष्मणरावांनीं केवळ निष्ठा व प्रयत्न यांच्या बळावर केवढ्या प्रचंड उद्योगाची उभारणी केली, हें लक्षांत आल्यावर अनेक होतकरू तरुणांस त्यांचें उदाहरण फार उपयुक्त ठरेल". असें चरित्रलेखकांनीं म्हटलें आहे, तें यथार्थ आहे. लक्ष्मणरावांच्या औद्योगिक क्षेत्रांतील कार्याइतकें त्यांचें सामाजिक क्षेत्रांतील कार्य सुप्रसिद्ध नाहीं, ह्याचें कारण त्यांचें सामाजिक कार्य भरीव असूनहि, औद्योगिक कार्य त्यापेक्षाहि डोळयांत भरणारें होतें, एवढेंच. शं. वा. किर्लोस्करांनीं प्रस्तुत पुस्तकांत ही गोष्ट दिग्दर्शित करून, विशेष कामगिरी बजावली आहे, असें आम्हांस वाटतें. लक्ष्मणरावांच्या व्यक्तिमत्वाचें विविध दर्शन झालें म्हणजे त्यांच्या कारखानदारीच्या करारी चेहऱ्यामागील माणूस दृष्टीस पडतो आणि वाचकाला पटतें, कीं कारखानदाराचा व्याप यांत्रिक असला, तरी त्याचें उद्दिष्ट त्यांतून संपदा निर्माण करण्याचें असतें; अखेर सामाजिक सुखसंपत्तीच्या निर्मितीसाठीच तो झटत असतो. शं. वा. किर्लोस्करांनीं लक्ष्मणरावांचें व्यक्तिदर्शन घडवितांना, त्यांना नसते गुण चिकटविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं; त्याची आवश्यकताहि नव्हती; इतकें मोठें त्यांचें व्यक्तित्व व कर्तृत्व आहे. उदाहरणार्थ, त्यांच्याकडे कोणी मनुष्य कांहीं मागायला गेला, तर त्यांची गांठ पडणेंहि कठीण; गांठ पडलीच, तर "काम करा, म्हणजे पैसे मिळतील," असें उत्तर मिळायचें. त्याच लक्ष्मणरावांनीं ६० वर्षांपूर्वी लावलेल्या उद्योगवृक्षाच्या छायेंत, वटवृक्षाच्या छायेंतील गायींच्या खिल्लारांप्रमाणें कित्येक लहान-मोठे कारखाने व हजारों कामगार आत्मविश्वासानें व सुखानें नांदत आहेत ! लक्ष्मणरावांच्यासारखा चरित्रनायक आणि शं. वा. किर्लोस्करांच्यासारखा चरित्रलेखक ह्यांचा संयोग झाल्यावर यांत्रिकाच्या यात्रेचें वर्णन किती आकर्षक झालें असेल, हें सांगावयास नकोच. कार्यापेक्षाहि त्यामागील व्यक्ति मोठी होती, असाच परिणाम वाचकांच्या मनावर होतो; आणि लेखकानें प्रत्यक्ष कथन केलें, त्यापेक्षा कितीतरी जास्त वाचण्याला मिळावें अशी वाचकांना इच्छा निर्माण होते. त्यांतच चरित्रलेखकाचें यश सामावलेलें आहे. पुस्तकांतील बहुविध चित्रांनीं व लक्ष्मणरावांनीं महाराष्ट्रीय तरुणांना दिलेल्या, हस्ताक्षरांतील कर्तव्यदक्षतेच्या संदेशानें 'यात्रे'ला जिवंतपणा आणला आहे.

---

**बिहारमधील साखरेचे कारखाने**—भारतामधील साखरेच्या धंद्यांत उत्तर प्रदेशाचा पहिला नंबर आणि बिहारचा दुसरा लागत असे. पण गेल्या कांहीं वर्षांत मुंबई राज्यानें बिहारला मागें सारून दुसरा क्रमांक मिळविला आहे. बिहारमधील उसाच्या शेतीपैकी २२ टक्के जमिनीलाच पाण्याचा निश्चित पुरवठा होऊं शकतो. गंडक नदीवरील धरण झाल्यावर मात्र ही परिस्थिति सुधारेल.

लेखक : शं. वा. किर्लोस्कर, पृ. सं. २०५, किं. ५ रु.

## सारस्वत बँकेच्या यशाचें गमक

"गेल्या चाळीस वर्षांत, एका लहान पतपेढीपासून तों देशांतील सर्वांत अग्रेसर अशा नागरी सहकारी बँकेमध्यें आपल्या बँकेचा जो विकास झाला आहे याबद्दल आपणां सर्वांना आनंद वाटणें स्वाभाविक आहे. या यशाचें गमक कशांत असेल तर सहकारी तत्त्वांनुसार वेगवेगळया बचत योजनांद्वारें बँकेनें केलेली बचतवाढ, पैशाची सुरक्षितता, ठेवीदार व सभासद यांची सोय, गरजूंच्या वाजवी आर्थिक गरजा भागवून उरलेल्या निधीची केलेली सुरक्षित गुंतवण. किती विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांस बँक पैसा पुरवीत आहे हें बँकेच्या अहवालावरून आपल्या लक्षांत येईलच. यापेक्षां अधिक अर्थसाहाय्य देण्याच्या हेतूनें बँकेचें सभासदत्व, आपल्या सभासद नोंदणीविषयक इतर इष्ट त्या नियमांच्या कक्षेंतच, सर्व जाती व वर्गांच्या लोकांस खुलें करण्यांत आलें आहे. यामुळें बँकेला आपला निधि चांगल्या रीतीनें वापरतां येऊन जास्तींतजास्त उद्योगधंद्यांना मदत करतां येईल असा मला विश्वास वाटतो. अर्थात् मला हें स्पष्ट केलें पाहिजे कीं, बँक धंदा वाढविण्याच्या मागें आहे असा मात्र याचा अर्थ होत नाहीं. परंतु सेवा व ग्राहकांना उपलब्ध केलेल्या सोयी या गोष्टींच्या योगें आपल्या व्यवहाराचा विकास करण्याची तिची उमेद आहे." सारस्वत को. बँकेचे अध्यक्ष, श्री. वा. पुं. वर्दे ह्यांचें वार्षिक सभेंतील भाषण.

---

## दि पूना अर्बन को. बँकेचे नवे पदाधिकारी

मा. सल्लागार मंडळ-( बिनविरोध )—

( १ ) मा. द. ब. इनामदार, अध्यक्ष ( २ ) मा. कि. ल. वारणे. ( ३ ) मा. ना. अ. सुकाळे, ( ४ ) मा. गो. ल. थत्ते, ( ५ ) मा. आ. स. देशमुख.

मा. व्यवस्थापक मंडळ—

( १ ) मा. र. पां. भोंडे, बी. ए., एलूएल. बी., वकील कार्याध्यक्ष, ( २ ) मा. व्यं. ना. पोळ, उपकार्याध्यक्ष, ( ३ ) दि. वि. इनामदार, ( ४ ) मा. व. ल. गोसावी, ( ५ ) मा. ल. घ. हुंबरे, ( ६ ) मा. म. भा. शेळके, ( ७ ) मा. मा. म. पवार, ( ८ ) मा. डॉ. द. त्र्यं. विसाळ, एल. सी. पी. एस्. ( ९ ) मा. मो. वि. रवडे.

स्थानिक हिशेब तपासनीस ( बिनविरोध )—

( १ ) मा. रा. कृ. देशपांडे.

## कै. वि. ज. करंदीकर

पुणें येथील एक सुप्रसिद्ध वकील व निष्ठावंत कार्यकर्ते श्री. वि. ज. ऊर्फ दादासाहेब करंदीकर यांचें दिनांक २३-९-५८ रोजीं मुंबई येथें आकस्मिक निधन झालें, त्याबद्दल शोक व्यक्त करण्याकरितां येथील सहकारी व इतर सार्वजनिक संस्था यांच्यातर्फें आज सायंकाळीं ५-३० वाजतां येथील पुणें सेंट्रल को-ऑप. बँकेच्या सभागृहांत श्री. नानासाहेब भोंडे यांचे अध्यक्षतेखाली शोकसभा भरली होती.

सभेंत सर्वश्री य. बा. सावंत इनामदार, वा. व. गोगटे, ग. र. तुळशीबागवाले, पोपटलाल शहा, शं. ल. ओगले, श्रीगोंदेकर, वि. त्र्यं शेटे, द. दि. चितळे प्रभृतींचीं प्रसंगोचित भाषणें झालीं. आपल्या भाषणांत या सर्व वक्त्यांनीं दादासाहेबांच्या अंगचा निर्भीड स्पष्टवक्तेपणा, समतोल शांतवृत्ति, सात्त्विक सौजन्य आणि उच्च पातळीवरील वर्तणूक या गुणांचा आणि एकूणच त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तित्वाचा गौरव केला.

## जागतिक बँकेच्या कार्याचें स्वरूप

( बँकेच्या नियामक मंडळाची १३ वी वार्षिक सभा दिल्ली येथें भरत आहे. त्या दृष्टीनें खालील माहिती बोधप्रद होईल. )

अमेरिकेंतील ब्रेटन वुडस येथें जुलै, १९४४ मध्यें भरलेल्या आर्थिक परिषदेंत दि इंटर नॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपमेंट ( वर्ल्ड बँक ) या बँकेची स्थापना करण्यांत आली आणि जून १९४६ पासून तिच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बँक ही आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना असून ती खास यंत्रणा म्हणून यूनोशीं निगडित आहे. सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावणें आणि जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या लोकांचें राहणीमान सुधारणें असें या बँकेचें उद्दिष्ट आहे. ही बँक सदस्य राष्ट्रांस, सरकारी यंत्रणांस किंवा खाजगी उद्योगधंद्यास कर्ज देते. परंतु कर्जदार खुद्द सरकार नसल्यास संबंधित सदस्य सरकारनें त्यासाठी हमी द्यावी लागते.

### बँकेनें दिलेलीं कर्जें

या बँकेनें पहिलें एकूण ५० कोटी डॉलरचें कर्ज १९४७ मध्यें युरोपांतील युद्धोत्तर पुनर्रचना कार्यासाठी दिलें. जुलै १९५८ पर्यंत या बँकेनें ४६ राष्ट्रांतील वा प्रदेशांतील ६०० वर प्रकल्पांसाठी एकूण ३७ कोटी डॉलरहून अधिक रकमेचीं सुमारें २०० कर्जें दिलीं. त्यांपैकी आशियाई प्रदेशांस ९४·८ कोटी डॉलर मिळाले. या कर्जापैकी सुमारें १/३ रक्कम विद्युतनिर्मितीसाठी देण्यांत आली आणि त्यामुळें जगांतील विद्युत्‌निर्मितीशक्तींत ८० लक्ष किलोवॅटची भर पडली. रेल्वे, हमरस्ते, हवाईमार्ग व जलमार्ग यांसाठी १/३ रक्कम दिली असून राहिलेली रक्कम पाटबंधारे, पोलादाचें उत्पादन व सर्वसाधारण विकासकार्यें यांसाठी दिलेली आहे.

### गव्हर्नर आणि कार्यकारी संचालक

जगांतील ६७ राष्ट्रांचीं सरकारें या बँकेची सदस्य असून त्यांनीं आपआपल्या आर्थिक कुवतीप्रमाणें भांडवल भाग घेतलेले आहेत. या बँकेच्या नियामक ( गव्हर्नर ) मंडळासाठी प्रत्येक राष्ट्र आपल्या वतीनें एका नियामकाची ( गव्हर्नरची ) नेमणूक करतें. या मंडळाची वर्षांतून एकदां बैठक होते. यंदाची १३ वी वार्षिक सभा नवी दिल्ली येथें भरत आहे. भारताचे अर्थमंत्री हे या मंडळावरील भारताचे गव्हर्नर आहेत. या गव्हर्नरांनीं आपले बहुतेक अधिकार कार्यकारी संचालकांकडे सोपविलेले आहेत. त्यांची बैठक दर महिन्यांत किमान एकदां तरी भरते. सदर मंडळांत या बँकेच्या पांच मोठ्या भागधारक राष्ट्रांचे पांच आणि इतर राष्ट्रांनीं निवडलेले १२ संचालक असतात. मोठ्या भागधारकांत भारताची गणना होत असून माजी काम्प्ट्रोलर आणि ऑडिटर जनरल श्री. नरहरी राव हे भारतातर्फे कार्यकारी संचालक आहेत. कार्यकारी संचालक धोरणविषयक बाबींस जबाबदार असून त्यांना या बँकेनें दिलेल्या कर्जास मान्यता द्यावी लागते.

### बँकेचे अध्यक्ष

कर्ज आणि धोरणविषयक प्रश्न याबद्दल शिफारशी सादर करण्याच्या कामासुद्धां या बँकेच्या दैनंदिन व्यवहाराची जबाबदारी बँकेच्या अध्यक्षांवर असते. तोच कार्यकारी संचालक मंडळाचाहि अध्यक्ष असतो. सध्यां या बँकेचें अध्यक्षपद श्री. युजेन आर. ब्लॅक या अमेरिकन गृहस्थांनीं विभूषित केलें असून या जागेवर ते तिसऱ्यांदा काम करीत आहेत. निरनिराळ्या ४० राष्ट्रांहून अधिक राष्ट्रांतील सुमारें ५५० नोकर या बँकेंत काम करीत असून त्यांत बँकर, अर्थशास्त्रज्ञ, हिशोबनीस, इंजिनिअर व इतर तज्ज्ञ यांचा अंतर्भाव आहे. बँकेची केंद्र कचेरी अमेरिकेंतील वॉशिंग्टन येथें असून पॅरिस व न्यूयॉर्क येथेंहि तिच्या छोट्या कचेऱ्या आहेत.

### सदस्य सरकारांना तांत्रिक मदत

ही बँक कर्जपुरवठ्याबरोबर सदस्य सरकारांना विविध स्वरूपाची तांत्रिक मदत करते. त्यांत सदस्य राष्ट्रांच्या संभाव्य आर्थिक विकासाच्या दृष्टीनें त्या देशाची पाहणी करण्यापासून तों प्रादेशिक पाहणी वा विशिष्ट प्रकल्पांना सल्ला देण्यापर्यंतच्या कामांचा अंतर्भाव होतो. या बँकेनें आतांपर्यंत अशा पाहणीचीं १५ कामें केलीं. त्याचबरोबर भारत आणि पाकिस्तान या दरम्यान सिंधु खोऱ्यांतील पाण्याचें करावयाचें वांटप किंवा सुवेझ कालव्याचें राष्ट्रीयीकरण केल्यानें इजिप्तनें द्यावयाची नुकसानभरपाई, यासारख्या आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रश्नांबाबत तडजोड घडवून आणण्यासाठी आपलें वजन खर्च करण्याची कामगिरीहि ही बँक पार पाडीत असते.

### बँकेची भांडवल–उभारणी

बँकेच्या सदस्य सरकारांनीं भरलेल्या भांडवलांतूनच सर्व व्यवहार पार पाडावेत अशी कल्पना कधींच नसल्यानें ही बँक कर्ज देण्याबरोबरच कर्ज उभारतेहि. जगाच्या भांडवली बाजारांत स्वतःचे बॉण्ड विकून या बँकेनें बाकीचा निधि उभारलेला आहे. आपल्या कर्जापैकी कांहीं भागांची विक्री करून खासगी भांडवल गुंतविणाऱ्यांकडूनहि ही बँक पाठिंबा मिळविते. अशाप्रकारें भांडवलांत ४० कोटी डॉलरवर निधीची भर पडली असून तो विकासकार्यासाठी उपलब्ध असतो. येणारें उत्पन्न आणि पूर्वीं दिलेल्या कर्जाच्या परतफेडीचे येणारे हप्ते, यांचाहि कर्ज देण्यासाठी वापर करण्यांत येतो.

### कर्जें कोणत्या तत्त्वांवर दिलीं जातात ?

कर्ज देण्याचा व्यवहार पुढील तीन प्रमुख तत्त्वांवर केला जातो. ( १ ) कर्ज घेणाऱ्या राष्ट्रांची तें कर्ज परत करण्याची कुवत असली पाहिजे, ( २ ) परकीय हुंडणावळींत कर्ज घेणें समर्थनीय ठरेल इतका फायदा ज्यासाठी घेतलें त्या प्रकल्पांतून वा कार्यक्रमानें झाला पाहिजे, आणि ( ३ ) त्या योजनेची आखणी चांगली असली पाहिजे व अंमलबजावणी करतां येण्यालायक पाहिजे.

### पैसा कशासाठी पुरवला जातो ?

जागतिक बँक विकासयोजनांसाठी लागणाऱ्या अंतर्भूत खर्चासाठी पैसा पुरवीत नाहीं, तर सामान्यतः आयात केलेल्या मालाची किंमत व सेवेचें मूल्य याकरतांच कर्ज देतें. देशांतील चलनांतील खर्चाची व्यवस्था कर्जदारच करतो व ही रक्कम सामान्यतः बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाच्या रकमेइतकी किंवा त्याहूनहि अधिक असते. निरनिराळ्या प्रकल्पांसाठी बँकेकडून सुमारें ४०० कोटी डॉलर मिळाले. याचा अर्थ त्या प्रकल्पांत एकूण १२०० कोटी डॉलरहून अधिक रक्कम गुंतविलेली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लिमिटेड, कराड–सांगली.

### श्री. नी. आ. कल्याणी ह्यांचें अध्यक्षीय भाषण

( चेअरमन, श्री. कल्याणी, ह्यांच्या अनुपस्थितीमुळें श्री. धुळाप्पा अण्णा नवले ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें व श्री. कल्याणी ह्यांचें भाषण वाचलें. )

गेलीं ९–१० वर्षें सतत व चिकाटीनें प्रयत्न करून लँड मॉर्गेज बँकांचे व्यवहाराचा जास्त प्रसार व्हावा, शेतकरी बांधवांचें हित व्हावें व सहजासहजीं त्यांना कर्ज-पुरवठा करतां यावा म्हणून या बँकेनें शाखा काढण्याचें धोरण आंखलेलें होतें, हें आपणांस माहीत आहेच. आतांपर्यंत या ना त्या कारणामुळें शाखा काढण्यास मदत मिळत नव्हती. बँकेची तीव्र इच्छा असूनहि आर्थिक नुकसानीस पुन्हा तोंड द्यावें लागेल म्हणून ही जबाबदारी पुढें ढकलावी लागत होती. परंतु नुकतेच आपल्या मुंबई सरकारनें जनतेच्या विनंतीचा सहानुभूतिपूर्वक विचार करून शाखा काढल्यास, पहिलीं ३ वर्षें होणारें नुकसान अगर जास्तींत जास्त दरसाल ३००० रु. ची मदत देण्याचें ठरविलेलें आहे हें येथें जाहीर करण्यास मजला आनंद वाटत आहे. या प्रसंगीं आपल्या मुंबई सरकारचें अभिनंदन करणेंहि योग्य आहे. सरकारच्या साहाय्याचा विचार करून आपल्या बँकेच्या कार्यकारी मंडळानें तूर्त फलटण, इस्लामपूर, सातारा व तासगांव येथें १–२ वर्षांत शाखा काढण्याचें ठरविलें आहे. इतकेंच नव्हे तर एकदोन महिन्यांत फलटण व इस्लामपूर येथें शाखाहि उघडल्या जातील, असा बँकेस भरंवसा आहे.


दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अन्न-धान्याच्या उत्पादनांत वरीच वाढ व्हावी व परदेशाहून अन्न-धान्याची मागणी करावयास लागूं नये म्हणून अनेक प्रकारच्या योजना हातीं घेण्यांत आलेल्या आहेत. नवीन विहीर, विहीर-दुरुस्ती, एंजिन वगैरे वगैरे कारणांकरितां तगाई-कर्ज मिळत होतें व नवीन विहिरीच्या उत्तेजनार्थ पूर्वीं बक्षिसेंहि देण्यांत येत होतीं. आतां सरकारनें या कामाची विभागणी करून सहकारी लँड मॉर्गेज बँकांमार्फत अशा प्रकारचे कर्ज वांटावें म्हणून निर्णय घेतलेला आहे. नवीन विहिरीकरितां ऐपतीप्रमाणें लागेल तितका कर्ज–पुरवठाहि करतां येईल. त्याच बरोबर कर्जाच्या ⅓ अगर जास्तींत जास्त ५०० रुपयांपर्यंत बक्षीसहि बँकेमार्फत देण्याचें सरकारनें योजिलें आहे. त्याचप्रमाणें एंजिन, मोटार वगैरे विहिरीवर अगर नदीवर बसविण्यास याच प्रमाणांत कर्ज तर मिळणार आहे पण बक्षीसहि देण्याचा सरकारचा विचार आहे. या धोरणास अनुसरून गुजराथ भागांत, विशेषतः अहमदाबादकडे, खुद्द कमिशनर यांनीं कलेक्टर्स, मामलेदार, मुंबई लँड मॉर्गेज बँकेचे मॅनेजर इत्यादि सर्व संबंधित अधिकाऱ्यांची १–२ वेळ सभा घेऊन निश्चित असे निर्णय घेतले. विहिरीकरतां आतांपर्यंत २–३ महिन्यांत ४ लाख रुपये कर्ज दिलें गेलेलें आहे, तेव्हां आपल्या भागांतील कमिशनर व कलेक्टर्स यांनीं देखील याचा वेळींच विचार करणें किती जरुरीचें आहे याची कल्पना येईलच. सर्वांच्या सहकार्याशिवाय हें साधणें कठीण आहे. ( याच वेळीं ) ही योजना यशस्वी झाल्यास मुलकी खात्यावरील ताणहि कमी होणार आहे. तरी सहकारी खातें लँड मॉर्गेज बँक व कमिशनरसाहेब यांनीं निश्चित अशी योजना आखून जरूर तो निर्णय त्वरित घ्यावा अशी माझी विनंती आहे.

विहीर, जमीनसुधारणा, एंजिन वगैरे बाबतींत कर्जांचा पुरवठा


आगामी प्रकाशन
मधुमालतीनुं सौंदर्य
मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
गुजराती अनुवादकः
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.
प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४





किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

जास्त प्रमाणांत करतां यावा म्हणून लँड मॉर्गेज बँकेच्या नियमांत कांहींसा फेरबदल होऊन आकाराच्या सुमारें १०० पट कर्ज देण्याचेंहि निश्चित झालेलें आहे. तेव्हां शेतकरी बांधवांनीं त्याचा अवश्य फायदा घ्यावा. इतःपर सर्वसाधारणपणें शेती-करतां झालेलें कर्ज अगर करावयाच्या सुधारणा यांकडे भरपूर असें लक्ष दिलें जाईल यांत शंकाच नाहीं.

शेतकरी बांधवांना लँड मॉर्गेज बँकेकडून कर्ज मिळण्यास फार उशीर लागतो अशी नेहमींच टीका होत असते. अर्थात् कांहीं एका विशिष्ट चाकोरींतूनच या बँकांना कार्य करावें लागतें आणि कागदपत्र लवकर मिळाल्यास कर्जहि वेळेनुसार मिळूं शकतें हें आमच्या दोन्ही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना देखील पटलेलें आहे. त्यांतूनहि लवकरांत लवकर कर्ज मिळण्यासाठी अधिकाराचें विकेंद्रीकरण व्हावें म्हणून विहीर व विहीरदुरुस्तीकरतां ४००० रु. पर्यंतचें कर्ज येथल्या येथेंच मंजूर करण्याचा अधिकार सर्व लँड मॉर्गेज बँकांना मिळालेला असून अन्य कारणाकरितां २००० रु. पर्यंतचें कर्ज असेर मंजूर करण्याचे अधिकारहि सातारा, पूर्व खानदेश व पाचोरा लँड मॉर्गेज बँकांना मिळालेला आहे हें येथें जाहीर करण्यास मजला अभिमान वाटत आहे. तेव्हां त्याचाहि फायदा आमचे शेतकरी बांधव घेतीलच घेतील असा माझा विश्वास आहे.

मुंबई स्टेट को. ऑ बँक, लँड मॉर्गेज बँक, सौराष्ट्र लँड मॉर्गेज सेल परचेस युनियन्स, लहानमोठ्या सोसायटीज वगैरे सर्व सहकारी संस्थांना सरकारनें ज्या त्या संस्थांचे भाग घेऊन लाखों रुपये त्यांचे भांडवलांत गुंतविलेले आहेत. हीच मागणी या बँकेकडून करण्यांत आलेली आहे. परंतु अद्याप त्याबाबत विचार होणेचा आहे. सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांना माहीतच आहे कीं, मुंबई स्टेट को. ऑ. बँक, जिल्हा सेंट्रल को-ऑपरे-टिव्ह बँकांचे लाखों रुपयांचे शेअर्स घेऊन स्वतः कामकाजांत लक्ष घातलें जातें व हरप्रकारें साहाय्य करण्यांत येतें. पण तेच मुंबई स्टेट को. ऑ. लँड मॉर्गेज बँकनीं कर्जपुरवठ्यास लागणाऱ्या भांडवलाव्यतिरिक्त भरीव अशी कांहींहि जबाबदारी उचललेली नाहीं असें नाइलाजानें म्हणावें लागतें.

रिझर्व्ह बँकेच्या सूचनेस अनुसरून ग्रामीण भागांतील सुखी शेतकऱ्यांचेकरितां मध्यम मुदतीचे म्हणजे ७ वर्षे मुदतीचे नवीन कर्ज-रोखे काढले जाणार असून व्याज-मुद्दलाची हमी मुंबई सरकारनें घेतली आहे. अर्थात् या भांडवलाचा उपयोग लँड मॉर्गेज बँकेकडून शेती सुधारणेकरितां खर्ची पडणार आहे. सदर कर्ज-रोख्यांवरील व्याजाचे दर ५½ ते ५¾ टक्के राहील असें वाटतें.

---

**डॉ. मेरी स्टोप्स् ह्यांचें निधन**—संततिनियमनाच्या प्रसिद्ध पुरस्कर्त्या कुमारी डॉ. मेरी स्टोपस् ह्या आपल्या वयाच्या ७८ व्या वर्षी निधन पावल्या. ह्या विषयावर त्यांनीं बरींच पुस्तकें लिहिलेलीं आहेत. लंडन शहरांत संततिनियमनाविषयीं सल्ला देणारें जगांतील पहिलें केंद्र त्यांनीं १९२१ मध्यें स्थापन केलें होतें.

**अहमदाबादमधील कापडाचें उत्पादन**—१९५७ सालीं अहमदाबादमधील कापडाच्या गिरण्यांनीं ८० कोटी रुपये किंमतीचें कापड तयार केलें, व गिरणी कामगारांना २१·५ कोटि रुपये वेतनाच्या रुपानें वाटलें, कापसावर ३५ कोटि रुपये खर्च झाला आणि जळणासाठी ४ कोटि रुपये खर्च झाले.

**दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव**

या बँकेनें ता. ३०–६–१९५८ इ. स. रोजीं संपणाऱ्या वर्षांत केलेली प्रगति खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

| | इ स. १९५६–५७ | इ.स १९५७–५८ |
|---|---|---|
| सभासद संख्या | १,५७९ | १,७०५ |
| शेअर भांडवल रु. | ६५,९७५ | ७१,६६० |
| रिझर्व फंडस् रु. | ५५,६७९ | ६६,२७३ |
| ठेवी रु. | ५,९८,८०० | ७,२८,६०० |
| इन्व्हेस्टमेंटस रु. | ७७ ४५३ | १,३२.४७८ |
| खेळतें भांडवल रु. | ७,४६,०३३ | ८,९५,३०० |

संस्था रजिस्टर करण्याचे वर्षी सोसायटीचें अवघें रु. ३,४२५ शेअर भांडवल होतें. त्यांत सालोसाल प्रगति होऊन चालू वर्षी संस्थेचें शेअर भांडवल रु. ७१,६६० झालेलें आहे. त्याबरोबर रिझर्व फंडहि रु. ६६,२७३ पर्यंत वाढला आहे. ही बँक बेळगांव शहरांतील सहकारी संस्थांपैकी एक उत्तम प्रकारची संस्था आहे. या बँकेंत सभासदांना स्थावरतारण आणि जामीन-कीवर, हुंडीबंदी आणि कॅश-क्रेडिट कर्जें देण्यांत येतात. तसेंच सोनें चांदी वगैरे सारख्या मौल्यवान् जिनसांचे तारणावर, माल (कोठार) तारणावर आणि या बँकेंतील ठेव-पावती तारणावर अशा विविध प्रकारचीं कर्जें दिलीं जातात. चालू वर्षी या बँकेच्या एकूण खेळत्या भांडवलांत दीड लाख रुपयांची भर पडलेली दिसून येईल. तसेंच ठेव भांडवलांत सुमारें एक लाख, तीस हजार रुपयांनीं वाढ झालेली आहे. वर दिलेल्या तक्त्यावरून या बँकेची सर्वांगीण प्रगति होत असल्याचें स्पष्ट दिसतें.

बँकेचें कार्यक्षेत्र संपूर्ण बेळगांव तालुका असल्याकारणानें बहुजन समाजाची ही बँक आर्थिक क्षेत्रांतील आश्रयदात्री आहे. आपला पैसा घरांत निश्चेष्ट व अनुपकारक स्थितींत पाडून ठेवण्याची जुनी-रानटी स्थिति टाकून देऊन स्वार्थ आणि परमार्थ हीं दोन्ही साधण्याकरितां कार्यक्षम सहकारी संस्थांचें शेअर भांडवल आणि ठेवी वाढविणें अति जरूर आहे. बँक आरंभापासून 'अ' वर्गांत आहे, या एका गोष्टीवरून संस्थेची संपन्नता लक्षांत येईल.

---

**पुणें म्यु. कॉ. स. को. अ. बँक लि.**

पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हेन्टस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेची वार्षिक निवडणूक दि. २८–९–५८ रोजीं होऊन खालील सभासद प्रचंड बहुमतानें निवडून आले.

**सल्लागार मंडळ:**—(१) मा. विश्वंभर दत्तात्रय नवले, (२) मा. कृष्णराव दगडोबा घारमळकर, (३) मा. रामकृष्ण दत्तात्रय भट, (४) मा. बाबूराव दत्तात्रय शिंदे, (५) मा. सिताराम घोडिंबा आबनावे.

**कार्यकारी मंडळ:**—(१) मा. नामदेव घोडिंबा भोकरे, (२) मा. वसंत रामकृष्ण कोतवाल, (३) मा. राउ तात्याबा कांबळे, (४) मा. दिनकर घोडिंबा कुऱ्हाडे, (५) मा. दत्तात्रय नाना कुंभार, (६) मा. आत्माराम बळवंत टण्णू, (७) मा. भिमराव विष्णु पाटील, (८) मा. मधुकर चिंतामण तिखे, (९) मा. परशुराम नागोजी जाधव, (१०) मा. प्रभाकर गणपत ठोसर, (११) मा. पांडुरंग घोडिंबा सोनवणे.

**लोकल ऑडिटर:**—मा. मोरेश्वर विनायक गोडबोले.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.